महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५ अंतर्गत लोकसेवा, नियत कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व व्दितीय अपिलीय अधिकारी प्रसिध्द करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग ऊर्जा व कामगार विभाग,
शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण २०१५/प्र.क्र.१२/कामगार-९
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १२ ऑक्टोबर,२०१५

वाचा : १) शासन निर्णय उद्योग उर्जा व कामगार विभाग क्रमांक संकीर्ण २०१५/प्र.क्र. १२/कामगार-९ दि. १८ सप्टेंबर, २०१५

२) शासन अधिसूचना क्रमांक एफएसी ११/२०१४/प्र.क्र. ३४७/कामगार ४ दि. २८ सप्टेंबर, २०१५

प्रस्तावना :-

संदर्भ क्र. १ येथे नमूद केलेल्या दि. १८ सप्टेंबर, २०१५ च्या शासन निर्णयान्वये या विभागाच्या प्रशासकीय अधिपत्याखालील औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयामार्फत पुरविण्यात येणाऱ्या ४ सेवा या महाराष्ट्र लोकसेवा अधिनियमांतर्गत पुरविण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णयातील परिशिष्ट अ मध्ये सदर लोकसेवांची सूची, नियत कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिलीय अधिकारी यांचा तपशिल देण्यात आलेला आहे. तद्नंतर संदर्भ क्र. २ येथे नमूद केलेल्या दि. २८ सप्टेंबर २०१५ च्या अधिसूचनेन्वये धोकादायक कारखाने वगळून इतर कारखान्यांच्या संदर्भात त्यांनी महाराष्ट्र कारखाने नियम १९६३ अंतर्गत परवाना देणे व परवाना नुतनीकरण या करीता परिपूर्ण अर्ज प्राप्त झाल्यापासून सात दिवसांची कालयमर्यादा निश्चित करण्यात आली आहे. सदर बाब विचारात घेवून यापूर्वी दि. १८ सप्टेंबर, २०१५ च्या शासन निर्णयात नमूद सेवांच्या कालमर्यादात सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्या अनुषंगाने शासनाने खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय :-

१. उपरोक्त संदर्भ क्र. १ येथे नमूद केलेल्या दिनांक १८ सप्टेंबर, २०१५ चा शासन निर्णय अधिक्रमीत करुन शासन खालील प्रमाणे आदेश देत आहे.

२. या शासन निर्णयाच्या परिशिष्ट-अ मध्ये नमूद केलेल्या एकूण २ सेवा संचालक, औद्योगिक सुरक्षा व व आरोग्य संचालनालय या कार्यालयामार्फत महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ च्या कलम ३ नुसार अधिसूचीत करावयाच्या आहेत.

३. या अधिनियमांतर्गत सेवा पुरविण्यासाठी आकारावयाची फी निश्चित करण्याची संबंधीत संचालक यांना मूभा राहील. तसेच संबंधीत कार्यालयाची रचना विचारात घेवून पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व व्दितीय अपिलीय अधिकारी इत्यादीमध्ये संबंधीत संचालकांना सुधारणा करता येईल.

४. संचालक औद्योगिक सुरक्षा व आरोगय संचालनालय यांनी त्यांच्या कार्यालयामार्फत पुरविण्यात येणाऱ्या लोकसेवांची सूची, नियत कालमर्यादा, अर्जाचा विहीत नमूना, फी, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व व्दितीय अपिलीय अधिकारी यांचा तपशिल कार्यालयाच्या सूचना फलकावर तसेच त्यांच्या संकेतस्थळावर किंवा पोर्टलवर प्रदर्शित करावा.

५. संचालक , औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय यांनी उपरोक्त प्रमाणे उक्त अधिनियमाच्या कलम ३ नुसार सेवा अधिसूचीत करणे व त्याची अंमलबजावणी करण्याची कार्यवाही तात्काळ करावी.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५१०१२११५२२०३९१० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Varsha M Bharose

Digitally signed by Varsha M Bharose
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=1bd844032884bbf2167bc99cd85325223aceef69d02bd455b7ca6972491623e0, cn=Varsha M Bharose
Date: 2015.10.12 15:14:38 +05'30'

( व.मुं.भरोसे )
उप सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत -

१) मा.राज्यपाल यांचे सचिव
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३) मा.मंत्री(कामगार) यांचे खाजगी सचिव

४) मा.राज्यमंत्री(कामगार) यांचे खाजगी सचिव
५) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
६) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,सर्व मंत्रालयीन विभाग
७) आयुक्त, कामगार आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
८) संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
९) संचालक, बाष्पके संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१०) सर्व प्रादेशिक कार्यालये, कामगार आयुक्तालय/औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय/बाष्पके संचालनालय
११) सर्व कार्यासने, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१२) निवडनस्ती.

परिशिष्ट अ

| क्र. | लोकसेवेचा तपशिल | लोकसेवा पुरविण्यासाठी विहित केलेली कालमर्यादा | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी | व्दितीय अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | कारखाने अधिनियम, १९४८ च्या महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ अंतर्गत नोंदणी व परवाना देणे व परवाना नूतनीकरण करणे | ७ दिवस | विभागीय अपर / सह संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य | अपर संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, मुंबई | संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, महाराष्ट्र राज्य |
| २ | कारखाने अधिनियम, १९४८ च्या महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ अंतर्गत दुय्यम परवाना देणे परवाना दुरुस्ती / करणे | ७ दिवस | विभागीय अपर / सह संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य | अपर संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, मुंबई | संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, महाराष्ट्र राज्य |

टिप : उपरोक्त कालमर्यादा ही केवळ अतिधोकादायक/ धोकादायक कारखाने वगळून इतर कारखान्यांना लागू राहील. (अतिधोकादायक व धोकादायक कारखान्यांच्या संदर्भात कारखाने अधिनियम, १९४८ व महाराष्ट्र कारखाने नियम १९६३ मध्ये नमूद करण्यात आलेली कालमर्यादा लागू राहील.)